ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 13 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**बंगालमध्ये सरकारी इमारतीला भीषण आग; निवडणुकीत वापरलेले 4,000 EVM जळून खाक**





पान 3 वरुन...

चिंचवड यात्रेत 'मेड इन पाकिस्तान' चादरीची विक्री?

## 14 कलमी करारामुळे हॉर्मुझ सामुद्रधुनी खुली होणार

# इराण-अमेरिकेत ऐतिहासिक करार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गेल्या काही महिन्यांपासून मध्य पूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य शांतता कराराची चर्चा वेगाने सुरू झाली आहे. इराणच्या निम-सरकारी मेहर वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, दोन्ही देशांदरम्यान १४ कलमी शांतता कराराचा मसुदा तयार करण्यात आला असून त्यामध्ये संघर्ष समाप्ती, होर्मुझ सामुद्रधुनीचे पुनरुज्जीवन, आर्थिक निर्बंधांमध्ये शिथिलता आणि अणुकार्यक्रमासंदर्भातील महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश आहे. तथापि, या मसुद्याला अद्याप अमेरिका किंवा इराणकडून अधिकृत मान्यता मिळालेली नसून तो अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले जात आहे.**

मसुद्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मध्य पूर्वेतील विविध आघाड्यांवर सुरू असलेले संघर्ष तात्काळ आणि कायमस्वरूपी थांबविणे. लेबनॉनमधील संघर्षासह इतर प्रादेशिक तणाव कमी करण्यासाठी दोन्ही देशांनी सकारात्मक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. गेल्या काही महिन्यांत वाढलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा, समुद्री वाहतूक आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम झाला होता. त्यामुळे या कराराकडे जगभरातील देशांचे लक्ष लागले आहे.

करारानुसार, जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या समुद्री मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीचे कामकाज ३० दिवसांच्या आत पूर्ववत सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. ही सामुद्रधुनी पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडते आणि जगातील मोठ्या प्रमाणातील कच्च्या तेलाची वाहतूक याच मार्गाने होते. सामुद्रधुनी बंद राहिल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतीत चढ-उतार दिसून आले होते. सामुद्रधुनी सुरू झाल्यास जागतिक व्यापार आणि ऊर्जा पुरवठा साखळीला मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र, मसुद्यानुसार या मार्गाचे संचालन आणि सुरक्षा व्यवस्थेवर इराणची देखरेख राहणार आहे.

मसुद्यात अमेरिकेकडून इराणच्या सार्वभौमत्वाचा आदर करण्याची आणि त्याच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याची हमी देण्यात आली आहे. तसेच अमेरिकेने इराणच्या किनारपट्टीजवळील नौदल नाकेबंदी ३० दिवसांच्या आत हटवावी आणि परिसरातील लष्करी उपस्थिती कमी करावी, अशी अटही नमूद करण्यात आली आहे. या तरतुदींचा उद्देश दोन्ही देशांतील अविश्वास कमी करून दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करणे हा आहे.

दरम्यान, इराणवरील आर्थिक निर्बंध शिथिल करण्याबाबतही महत्त्वपूर्ण चर्चा सुरू असल्याचे वृत्त आहे. विशेषतः इराणच्या तेल निर्यातीवरील निर्बंध हटविणे किंवा तात्पुरते स्थगित करणे यावर विचार सुरू आहे. जर याबाबत सकारात्मक निर्णय झाला, तर इराणला जागतिक ऊर्जा बाजारात पुन्हा मोठ्या प्रमाणावर प्रवेश मिळू शकतो. यामुळे जागतिक स्तरावर तेलाचा पुरवठा वाढून किमतींवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मसुद्यानुसार, इराणच्या पुनर्बांधणीसाठी अमेरिका आणि तिच्या सहयोगी राष्ट्रांकडून किमान ३०० अब्ज डॉलर्सच्या आर्थिक मदतीची रूपरेषा तयार करण्यात येणार आहे. अनेक वर्षांच्या निर्बंधांमुळे आणि प्रादेशिक संघर्षांमुळे प्रभावित झालेल्या इराणच्या अर्थव्यवस्थेला या निधीमुळे मोठा आधार मिळू शकतो. पायाभूत सुविधा, ऊर्जा क्षेत्र, आरोग्य आणि औद्योगिक विकासासाठी हा निधी वापरण्यात येऊ शकतो.

अणुकार्यक्रमासंदर्भातही मसुद्यात महत्त्वाच्या अटी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. इराणने पुन्हा एकदा अण्वस्त्रे विकसित न करण्याची हमी दिली असून त्याबदल्यात अमेरिका वाटाघाटींच्या कालावधीत कोणतेही नवीन निर्बंध लागू करणार नाही तसेच या प्रदेशातील लष्करी उपस्थिती वाढवणार नाही. या मुद्द्यावर दोन्ही देशांमध्ये पुढील ६० दिवस सविस्तर चर्चा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

याशिवाय, इराणचा गोठवलेला सुमारे २४ अब्ज डॉलर्सचा निधी मुक्त करण्याचा प्रस्तावही करारात समाविष्ट करण्यात आला आहे. हा निधी उपलब्ध झाल्यास इराणच्या अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळू शकतो. कराराच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र देखरेख यंत्रणा स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली असून अंतिम कराराला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावाद्वारे मान्यता देण्याची योजना आहे.

मात्र, मसुद्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, इराणचा किमान निम्मा गोठवलेला निधी मुक्त होणे, तेलावरील निर्बंध शिथिल होणे आणि नौदल नाकेबंदी हटविणे या प्राथमिक अटी पूर्ण झाल्यानंतरच अंतिम वाटाघाटी सुरू होतील. त्यामुळे सध्या हा मसुदा चर्चेच्या टप्प्यात असला तरी त्याच्या अंमलबजावणीसाठी पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

या संभाव्य करारामुळे मध्य पूर्वेतील तणाव कमी होण्याबरोबरच जागतिक ऊर्जा बाजार, समुद्री व्यापार आणि आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाची भूमिका आणि अमेरिकेची अधिकृत प्रतिक्रिया याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.



### अण्वस्त्रे विकसित न करण्याचा करार

या मसुद्यात, इराणने पुन्हा एकदा अण्वस्त्रे विकसित न करण्याचे करार केला आहे. त्या बदल्यात, अमेरिका वाटाघाटींदरम्यान या प्रदेशात आपली लष्करी उपस्थिती वाढवणार नाही आणि इराणवर कोणतेही नवीन निर्बंध लादणार नाही. या करारामध्ये इराणचा गोठवलेला २४ अब्ज डॉलर्सचा निधी मुक्त करण्याचाही प्रस्ताव आहे. कराराच्या पालनावर देखरेख ठेवण्यासाठी एक विशेष यंत्रणा स्थापन केली जाईल. अंतिम कराराला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावाद्वारे मंजुरी देण्याचीही योजना आहे.

जोपर्यंत इराणचा निम्मा निधी मुक्त होत नाही, तेलावरील निर्बंध स्थगित होत नाहीत आणि नौदल नाकेबंदी उठवली जात नाही, तोपर्यंत अंतिम वाटाघाटी सुरू होणार नाहीत, असेही यामध्ये म्हटले आहे.

### तेल निर्बंध स्थगित करण्याबाबत चर्चा

इराणच्या तेलावरील अमेरिकेचे निर्बंध हटवण्याबाबत किंवा स्थगित करण्याबाबतही चर्चा सुरू आहे. अमेरिका आणि तिच्या मित्र राष्ट्रांना इराणच्या पुनर्बांधणीसाठी किमान ३०० अब्ज डॉलर्सची योजना तयार करावी लागेल. अणुकार्यक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर आणि सर्व आर्थिक निर्बंध हटवण्याबाबत अंतिम करार करण्यासाठी दोन्ही देश ६० दिवसांची वाटाघाटी देखील करतील.

# पुणेकरांवर अखेर पाणीकपातीची कुऱ्हाड

## कोणत्या भागांना कधी होणार पुरवठा? अधिकृत वेळापत्रक जाहीर

**महाईन्यूज । पुणे**

**पुणेकरांवर अखेर पाणीकपातीची कुऱ्हाड कोसळली असून, येत्या १५ जूनपासून संपूर्ण शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा लागू होणार आहे. सम आणि विषम तारखांनुसार शहरातील विविध भागांचे वर्गीकरण करण्यात आले असून, त्यानुसार पाणीपुरवठ्याचे अधिकृत वेळापत्रक महापालिकेने बुधवारी जाहीर केले.**





> पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाणीगळती, अपव्यय आणि अनावश्यक वापर टाळावा; तसेच पाण्याचा विनाकारण साठा करू नये. धरणांमध्ये समाधानकारक आवक सुरू झाल्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल.
> **- मंजूषा नागपुरे, महापौर**

महापौर मंजूषा नागपुरे यांनी याबाबतचा निर्णय जाहीर केला. या वेळी सभागृह नेते गणेश बीडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर; तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांच्या उपस्थितीत ही माहिती दिली. खडकवासला धरणसाखळीतील झपाट्याने घटणारा जलसाठा आणि पुढील तीन महिन्यांचे नियोजन लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुळशी धरणातून पुणे शहरासाठी पाच टीएमसी पाणी देण्याचा प्रस्ताव पूर्वीच मान्य झाला आहे. त्याची अंमलबजावणी अजून झालेली नाही. या प्रस्तावासंदर्भात महापालिका प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली याचे स्पष्टीकरण द्यावे, असे निर्देश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पाणीपुरवठा गुरुवारी विभागाला दिले आहेत. आज (शुक्रवारी) होणाऱ्या स्थायीच्या बैठकीत पाणीपुरवठा विभाग याबाबत माहिती देणार आहे, असे भिमाले म्हणाले.

डेक्कन, प्रभात रस्ता, एरंडवणा, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, जनता वसाहत, गोखलेनगर, औंध, खडकी, बोपोडी, बालेवाडी, भोसलेनगर, सुतारवाडी, पाषाण, म्हाळुंगे, बाणेर, वारजे, कर्वेनगरचा काही भाग, तळजाई, कोंढवा बुद्रुकचा मोठा भाग, बालाजीनगर, कात्रज, धनकवडी, सिंहगड रस्ता, हिंगणे, नांदेड, नवी पेठ, पर्वती, येरवडा, चंदननगर, पठारे वस्ती, बायपास खराडी, कळस, कोरेगाव पार्क, विश्रांतवाडी, घोरपडी, केशवनगर; तसेच मध्य आणि पूर्व पुण्यातील पेठा परिसरांना पाणीपुरवठा केला जाणार आहे.

पश्चिम, दक्षिण आणि पूर्व भागातील अनेक परिसरांना पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यामध्ये कोथरूड (लक्ष्मीनगर वगळून), बावधन खुर्द व बुद्रुक, सुस रस्ता, पंचवटी, आंबेगाव खुर्द, दत्तनगर, संतोषनगर, कात्रज गावठाण, सुखसागरनगर, कात्रज-कोंढवा रस्ता, धायरीचा मोठा भाग, वडगाव गावठाण, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, गंगाधाम, पद्मावती, चिंतामणीनगर, सहकारनगरचा काही भाग, पर्वती गावठाण परिसर, खराडीतील काही भाग, कल्याणीनगर, चंदननगर, वडगाव शेरीचा काही भाग, संगमवाडी, मुंढवा, मगरपट्टा, हडपसरचा काही भाग, मुंढवा, वानवडी गावठाण, पुणे कॅंटोन्मेंट, विमाननगर आणि विश्रांतवाडीतील काही भागांचा समावेश आहे.

भामा आसखेड प्रकल्पातून सुरळीत आणि शुद्ध पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत या प्रकल्पातून ज्या परिसराला पाणीपुरवठा केला जातो, तो भाग दिवसाआड पाणी पुरवठ्याच्या नियोजनातून वगळण्यात आला आहे. या परिसरातील तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर या ठिकाणचे पाणीकपातीचे नियोजन जाहीर करण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले.

मांजरीला सध्या दिवसाआड, तर फुरसुंगी, उरुळी देवाची यांना दोन दिवसांआड पाणीपुरवठा होत असल्याने या ठिकाणी कोणतेही स्वतंत्र नियोजन करण्यात आलेले नाही. सध्या सुरू असलेल्या नियोजनाप्रमाणेच या ठिकाणचा पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. वाघोली जलकेंद्रातून तीन दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने येथील परिस्थितीही तशीच राहणार आहे.

# पुणे जिल्ह्यासह राज्यभरात रोटा लशीचा तुटवडा! लसीकरण कार्यक्रमाला खीळ

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्ह्यातील लसीकरण कार्यक्रमाला गेल्या काही दिवसांपासून खीळ बसली असून, डायरियापासून संरक्षणासाठी बालकांना दिल्या जाणाऱ्या रोटा लशीचा तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक तालुका स्तरावरील आरोग्य केंद्रांना ही लस उपलब्ध होत नसून, राज्यभरातच रोटा लशीचा पुरवठा विस्कळीत झाल्याचे स्थानिक प्रशासनाने मान्य केले आहे. येत्या २० जूनपर्यंत पुरवठा सुरळीत होण्याची शक्यता आरोग्य विभागाने व्यक्त केली आहे.**



> जिल्ह्यात कुठेही लशींचा तुटवडा नाही. सर्व सुरळीत आहे. आम्हाला जर कोणी मागणी केली, तर आम्ही ती त्वरित पूर्ण करतो. काही वेळा तांत्रिक अडचणींमुळे लस पोहोचण्यास उशीर होऊ शकतो. मात्र, आपल्याकडे मुबलक साठा असून अद्यायावत शीतगृहांची व्यवस्था आहे. २० जूनपर्यंत सर्व तालुक्यांतील आरोग्य केंद्रांना रोटा लशीचा पुरवठा होणार आहे. तालुका स्तरावरील सर्व आरोग्य केंद्रांनी निश्चित रहावे.
> **- डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी**

केंद्र सरकारच्या सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत बालकांना जन्मापासून विविध टप्प्यांमध्ये एकूण २१ प्रकारच्या लशी दिल्या जातात. जिल्ह्यांच्या मागणीनुसार राज्य स्तरावरून लशींचा पुरवठा केला जातो. मात्र, रोटा लशीचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांकडून पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने राज्यभर तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे अनेक जिल्ह्यांप्रमाणे पुणे जिल्ह्यातील लसीकरण मोहिमेवरही त्याचा परिणाम झाला आहे. आशा सेविकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, की राष्ट्रीय लसीकरण मोहिमेनुसार बालकांना विविध वयोगटांमध्ये आवश्यक लशी देणे बंधनकारक आहे. पुणे जिल्ह्यातील तालुका आणि उपकेंद्र स्तरावर लशींच्या वितरणात तांत्रिक अडचणी येत असल्याचे समोर आले आहे. तालुक्यांच्या मुख्य आरोग्य केंद्रांमध्ये काही प्रमाणात साठा उपलब्ध असला, तरी अनेक उपकेंद्रांमध्ये लशींची कमतरता भासत आहे.

रोटा लशीबरोबरच काही ठिकाणी धनुर्वात (टिटॅनस) लशीचाही मर्यादित साठा असल्याची माहिती समोर आली आहे. ही लस प्रामुख्याने गरोदर महिलांना प्राधान्याने दिली जात असल्याने इतर लाभार्थ्यांना ती उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्य स्तरावर रोटा लशीचा पुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा आहे. तोपर्यंत उपलब्ध साठ्याचे नियोजन करून लसीकरण सेवा सुरू ठेवण्यावर भर दिला जात आहे.

# "महेशदादा रस्ता करतील..." चिमुकल्याचा विश्वास सार्थ!

## ‘व्हायरल व्हीडिओ’नंतर रस्त्याच्या कामाला तात्काळ सुरूवात

## भाजपाचे आमदार महेश लांडगे यांची अबालवृद्धांमध्ये ‘क्रेझ’

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी विधानसभा मतदार संघातील ओम साई कॉलनी, मोरे वस्ती येथील नवीन रस्ता प्रस्तावित आहे. कच्चा रस्ता असल्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होत होती. याबाबत एका चिमुकल्याने सोशल मीडियावर व्हीडिओ प्रसारित केला. त्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला सूचना केली आणि आमदार निधीतून रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनसुद्धा करण्यात आले.**






पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समाविष्ट गावांमध्ये विकास आराखड्यातील प्रमुख रस्त्यांची कामांना गती देण्यात आली. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याचा अजेंडा राबवण्यात आला. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर निर्माण झाला आहे. मात्र, काही वाडी-वस्तींवर आजही अंतर्गत रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत. नवीन ग्रहप्रकल्प मोठ्या प्रमाणात विकसित होत आहेत. त्यांना ‘कनेक्टिव्हीटी’च्या दृष्टीने अंतर्गत रस्त्यांची कामे मार्गी लावण्याबाबत प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला जात आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर सुरज राहूल राऊत या मुलाचा व्हीडिओ व्हायरल झाला. त्यामध्ये सदर मुलगा ज्याला महेशदादा म्हणजे या विभागाचा आमदार आहे, याची माहिती आहे आणि त्याला कोणीतरी विचारले की, महेशदादाने काय केले पाहिजे? तर तो अगदी विश्वासाने सांगतो, “माझ्या गल्लीतील रस्ता डांबरीकरण केला पाहिजे” विशेष म्हणजे, “त्याला माझ्यावर विश्वास इतका की सांगतो, पावळ्यापूर्वी रस्ता झाला पाहिजे.” असा व्हीडिओ व्हायरल झाला. यावर आमदार लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी हा व्हीडिओ त्यांच्या निदर्शनास आणून दिला.

यावर, संबंधित चिमुकल्याचा विश्वास जपण्यासाठी आमदारांनी तातडीने प्रशासनाला सूचना दिल्या आणि प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरूवात केली. विशेष म्हणजे, हा माझा चिमुकला सहकारी रस्त्याच्या भूमिपूजनालाही हजर होता. त्याच्याशी आमदारांचा संवादही झाला. “रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर भेट द्या, असे तो हक्काने सांगतो आहे..” असा आपुलकीचा संवाद उपस्थितांना भारावून सोडणारा होता, असे सामाजिक कार्यकर्ते व जय भवानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष जितेंद्र यादव यांनी सांगितले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजोग मोरे, अविनाश सिंग, भूपेंद्र जाधव यांच्यासह सोसायटीधारक व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

तसेच, आठवडाभरापूर्वी, याच परिसरातील मुलांनी महावितरणच्या डीपीची दुरावस्ता झाल्याचा व्हीडिओ व्हायरल केला होता. यावर आमदार कार्यालयाने तातडीने कार्यवाही करीत नवीन डीपी बसवून दिला आहे. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करीत नागरी समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे, याचे सामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होते आहे, असेही जितेंद्र यादव यांनी सांगितले.

> **“भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाचा विश्वास हीच माझी सर्वात मोठी ताकद आहे. ओम साई कॉलनीतील चिमुकल्या सुरजने सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडलेली रस्त्याची मागणी ही केवळ एका मुलाची अपेक्षा नव्हती, तर त्या परिसरातील नागरिकांची गरज होती. त्याच्या निरागस विश्वासाचा मान राखणे हे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे तातडीने प्रशासनाला सूचना देऊन रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. विकासकामांबाबत नागरिकांनी व्यक्त केलेल्या प्रत्येक योग्य मागणीला सकारात्मक प्रतिसाद देणे आणि भोसरी मतदारसंघातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, यासाठी मी कायम कटिबद्ध आहे.”**
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### विश्वासाचा रस्ता खुला!

ओम साई कॉलनीतील चिमुकल्या सूरजने सोशल मीडियावरून रस्त्याची मागणी केली आणि त्याच्या निरागस विश्वासाचा मान राखत आमदार महेश लांडगे यांनी तातडीने रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. चिमुकल्याची साद आणि विकासकामांचा वेग यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# शाळा परिसर तंबाखूमुक्त करण्यासाठी पोलिसांची मोहीम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आणणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात सांगवी पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली आहे. शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात गुटखा, पानमसाला, सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या पानटपऱ्या व दुकानांना कायदेशीर नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.**



शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री रोखण्यासाठी सांगवी पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या नोटीसद्वारे दुकानदारांना नियमांचे पालन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मात्र, वारंवार सूचना देऊनही नियमभंग सुरू राहिल्यास संबंधित विक्रेत्यांविरोधात COTPA कायद्यानुसार न्यायालयीन कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम (COTPA) २००३ नुसार शाळा, महाविद्यालय किंवा इतर शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास बंदी आहे. तसेच शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशद्वारावर संबंधित सूचना फलक लावणे बंधनकारक आहे. अल्पवयीन विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे हा दंडनीय गुन्हा मानला जातो.

सांगवी पोलिसांच्या या मोहिमेचे पालक, शिक्षक आणि स्थानिक नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना व्यसनाच्या विळख्यात जाण्यापासून रोखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी सांगितले की, शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होऊ नये यासाठी दामिनी पथक आणि मार्शल यांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबवली जात आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर COTPA अंतर्गत खटले दाखल करण्यात येणार आहेत.

> शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होऊ नये, यासाठी सांगवी पोलिस ठाण्याच्या दामिनी पथक आणि मार्शल यांच्या वतीने पान टपरी, सिगारेट, गुटखा विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. COTPA कायद्यानुसार शैक्षणिक संस्थांच्या 100 मीटर परिसरात गुटखा, पानमसाला, सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास बंदी आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर COTPA अंतर्गत खटले भरणार आहेत.
> **- जितेंद्र कोळी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सांगवी पोलिस**



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच शेतकऱ्यांना सेंद्रिय खतांचा वापर वाढवण्याचा सल्ला दिला. जमिनीचा पोत टिकवण्यासाठी आणि दीर्घकालीन उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा सल्ला वस्तुस्थितीवर आधारित असून त्याचे स्वागतच केले पाहिजे.**

# शब्द एक, कृती दुसरी; खतधोरणाचा गोंधळ




मात्र, याचवेळी केंद्र सरकारने युरिया खतावरील अनुदानात मोठी वाढ केल्याने धोरणातील विरोधाभास अधोरेखित झाला आहे.

भारतात युरियाची प्रत्यक्ष किंमत हजारो रुपयांमध्ये असताना शेतकऱ्यांना ते अत्यंत कमी दरात उपलब्ध करून दिले जाते. उर्वरित खर्च सरकार उचलते. त्यामुळे युरियाचा वापर आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणात होतो. परिणामी जमिनीतील सेंद्रिय घटक कमी होतात, क्षारांचे प्रमाण वाढते आणि मातीची सुपीकता घटते. एकीकडे सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करायचा आणि दुसरीकडे रासायनिक खतांना अधिक अनुदान द्यायचे, हा विरोधाभास चिंताजनक आहे.

इराणसह पश्चिम आशियातील तणावामुळे नैसर्गिक वायू, पोटॅश आणि फॉस्फेट यांसारख्या खतनिर्मितीसाठी आवश्यक घटकांच्या किमती वाढत आहेत. त्यामुळे खत अनुदानाचा सरकारी खर्च मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. हा खर्च अखेरीस करदात्यांच्या खिशातूनच जातो. देशाच्या आर्थिक शिस्तीच्या दृष्टीनेही ही बाब गंभीर मानावी लागेल.

युरियावरील अनुदानाचा सर्वाधिक फायदा काही विशिष्ट पिके घेणाऱ्या आणि तुलनेने मोठ्या शेतकऱ्यांना होतो. गहू आणि तांदूळ उत्पादक प्रदेशांमध्ये युरियाचा अतिवापर झाल्याने जमिनीची गुणवत्ता खालावत असल्याचे अनेक अभ्यास सांगतात. त्यामुळे अनुदानाचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचतो का, याचाही पुनर्विचार आवश्यक आहे.

सरकारने इतर अनेक योजनांमध्ये 'आधार' आणि थेट लाभ हस्तांतरणाची यशस्वी अंमलबजावणी केली. मात्र खत अनुदान अद्याप सरसकट स्वरूपात दिले जाते. त्यामुळे गैरवापर, अपव्यय आणि अनावश्यक वापराला खतपाणी मिळते. गरजेनुसार आणि लक्ष्यित पद्धतीने अनुदान देण्याचा पर्याय आजही दुर्लक्षित आहे.

वास्तविक, जागतिक परिस्थितीतील बदल आणि वाढता आर्थिक भार पाहता खत अनुदान व्यवस्थेत सुधारणा करण्याची ही योग्य वेळ होती. १९९१ च्या आर्थिक सुधारणांप्रमाणे धाडसी निर्णय घेण्याची संधी सरकारकडे होती. परंतु ती साधण्याऐवजी जुन्याच पद्धतीला चालना देण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांचे दीर्घकालीन हित, जमिनीचे आरोग्य आणि सरकारी तिजोरी या तिन्हींचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे.

शेतीचे भवितव्य केवळ उत्पादनवाढीत नसून शाश्वततेत आहे. सेंद्रिय आणि संतुलित खतवापराचा संदेश प्रत्यक्ष धोरणांमधूनही दिसला पाहिजे. अन्यथा खतांच्या खादाडीचा हा वाढता खतरा शेती आणि अर्थव्यवस्था दोन्हींसाठी घातक ठरू शकतो.

## प्रासंगिक »

### स्वभाव आणि छंद

**'समानशीले व्यसनेषु सख्यम्' हे सुभाषित आपण वारंवार ऐकतो आणि त्याचे प्रत्यंतर समाजात वावरताना आपणाला येते. याच सुभाषिताचा दाखला देणारी ही कथा.**

एका साध्या संवादातून हा बोध आपणाला मिळेल. एकदा प्रचंड महापुरात नदीच्या पात्रातून दोन भांडी वाहत होती. त्यापैकी एक होते पितळेचे, तर दुसरे होते मातीचे. त्या पुरातुन वाहत जातानाच त्यांच्यात संवाद चालला होता. पितळीचे भांडे मातीच्या भांड्याला म्हणत होते, "अरे, इतका दुरून का चालला आहेस? ये ना माझ्याजवळ. दोघेजण हातात हात घालून जाऊ. कशी मजा येईल बघ तरी. मला डोळे भरून पाहता येईल आणि या प्रचंड वेग असलेल्या पाण्यापासून तुझं संरक्षणही करता येईल." मातीच्या भांड्याने पितळेच्या भांड्याचे आभार मानून म्हटले, "कृपा करून कोणत्याही स्थितीत तू माझ्याजवळ येऊ नकोस. तुझीच मला सर्वात जास्त भीती आहे. तुझा थोडासा जरी धक्का मला लागला, तरी माझ्या ठिकऱ्या उडतील. तुझा माझा देहभाव भिन्न आहे."

- तात्पर्य : भिन्न स्वभावाचे, छंदाचे लोक एकत्र कसे येणार ?

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे वर्धापन दिन नुकतेच पार पडले. या निमित्ताने पक्षसंघटना, नेतृत्व आणि विचारधारा यांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली.

## राष्ट्रवादीसमोरील खरा प्रश्न : पक्षविस्तार की वैचारिक स्पष्टता?

विशेषतः राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप नेत्या नवनीत राणा यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी देण्याचा विचार झाल्याच्या चर्चेमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस स्वतःला फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांची वारसदार मानते. अशा वेळी कट्टर हिंदुत्ववादी भूमिका घेणाऱ्या नवनीत राणा यांना पक्षात आणण्याचा प्रयत्न झाला, ही बाब पक्षाच्या वैचारिक भूमिकेबाबत संभ्रम निर्माण करणारी ठरते. पक्षविस्तारासाठी विविध क्षेत्रांतील नेत्यांना सामावून घेणे वेगळे आणि पक्षाच्या मूलभूत विचारधारेशी विसंगत व्यक्तींना महत्त्वाच्या पदांसाठी विचारात घेणे वेगळे.

यातील सीमारेषा धूसर होत असल्याचे चित्र दिसते. भाजपमधून आलेल्या काही नेत्यांना तत्काळ महत्त्वाच्या संधी देणे किंवा विविध पक्षांतून आलेल्या व्यक्तींना थेट उमेदवारी बहाल करणे, ही केवळ राजकीय गणिताची बाब राहिलेली नाही. त्यातून पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये




आणि समर्थकांमध्येही संभ्रम निर्माण होतो. विचारधारेपेक्षा सत्तेचे समीकरण अधिक महत्त्वाचे ठरत असल्याची भावना बळावते.

दुसरीकडे, शरद पवार गटाकडे संघटनात्मक ताकद तुलनेने कमी असली तरी त्यांच्या भूमिकेत वैचारिक सातत्य अधिक स्पष्टपणे दिसते. भाजपविरोधी भूमिका, पुरोगामी विचारांची मांडणी आणि त्यासाठी सक्रियपणे रस्त्यावर उतरणारे नेते या गटात आहेत. त्यामुळे विचारधारेच्या पातळीवर त्यांना काही प्रमाणात नैतिक बळ मिळते. अजित पवार गटाकडे सत्ता, संघटन आणि संसाधने आहेत. मात्र भाजपसोबत सत्तेत राहूनही स्वतःची स्वतंत्र पुरोगामी ओळख टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. त्यासाठी केवळ राजकीय विस्तार पुरेसा नाही; तर विचारांची स्पष्टता आणि त्यानुसार कृतीही आवश्यक आहे. राजकारणात सत्ता हे प्रभावी आकर्षण असते. त्यामुळे विविध विचारांचे लोक एकत्र येतात. मात्र पक्षाचा विस्तार आणि विचारांचा विस्तार या दोन भिन्न गोष्टी आहेत.

नेते आयात करता येतात, पण विचारांची परंपरा आयात करता येत नाही. कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवायचा असेल तर पक्षाने आपल्या वैचारिक चौकटीची जपणूक करणे आवश्यक ठरते. राष्ट्रवादीतील संघर्ष हा केवळ पक्षाच्या नावाचा किंवा चिन्हाचा नाही. तो विचार आणि व्यवहार, वारसा आणि सत्ता, तसेच ओळख आणि विस्तार यांच्यातील संघर्ष आहे. पक्षाचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवणे योग्य असले, तरी वैचारिक खिडक्या कोणत्या दिशेने उघड्या ठेवायच्या याचा निर्णयच पक्षाचे भवितव्य ठरवणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सासुरियां वीट आला भरतारा ।
इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥

सांडवर कोणी न धरिती हातीं ।
प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# NEET (UG)-2026 परीक्षेत मोठे बदल!

## विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी 'NTA' चा मोठा निर्णय

**महाईन्यूज । वर्धा**

**यावर्षी सर्वात गाजलेली व वादग्रस्त ठरलेली एकमेव परीक्षा म्हणजे नीट होय. वैद्यकीय अभ्यासक्रमांची ही प्रवेश परीक्षा केंद्रासाठी परीक्षा घेणारी ठरली. कोक्रोच जनता पार्टीने तर या विषयावर रान उठविले. हा धडाका देशभर चर्चेत आला. मात्र या परीक्षेबाबत गंभीर असणाऱ्या केंद्र शासनाने ठोस पाऊल टाकण्याचा मानस ठेवलाच होता. त्याचा आज अखेर अंमल झाला आहे.**



वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'नीट' (NEET UG-2026) प्रवेश परीक्षा यंदा २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (NTA) विद्यार्थ्यांचे हित आणि त्यांचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने काही महत्त्वपूर्ण आणि विद्यार्थी-अनुकूल बदल जाहीर केले आहेत. एनटीएने आज, १२ जून २०२६ रोजी एक अधिकृत परिपत्रक जारी करून या सुधारणांची माहिती दिली.

या नव्या बदलांनुसार, विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष परीक्षेचा वेळ प्रशासकीय सोपस्कारांमुळे वाया जाऊ नये, यासाठी परीक्षेचा कालावधी वाढवून १९५ मिनिटे करण्यात आला आहे. आता ही परीक्षा दुपारी २:०० ते संध्याकाळी ५:१५ या वेळेत पार पडेल.

परीक्षार्थींसाठी दुसरा मोठा बदल म्हणजे प्रश्नपत्रिकेत रफ वर्क (कच्च्या कामासाठी) मिळणाऱ्या जागेत करण्यात आलेली वाढ होय. भौतिकशास्त्र (PHYSICS) आणि रसायनशास्त्रातील (CHEMISTRY) क्लिष्ट गणिते व आकृत्या सोडवण्यासाठी आधी केवळ २ पाने दिली जात असत. मात्र, विद्यार्थ्यांच्या फीडबॅकचा विचार करून आता रफ वर्कसाठी २ ऐवजी ४ पाने उपलब्ध करून दिली जाणार आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आकडेमोड करण्यासाठी पुरेशी जागा मिळेल.

याशिवाय, प्रश्नपत्रिकेच्या रचनेतही (BOOKLET DESIGN) एक अत्यंत संवेदनशील बदल करण्यात आला आहे. पूर्वी सर्व रफ पेजेस प्रश्नपत्रिकेच्या अगदी शेवटी असायची. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना, विशेषतः डाव्या हाताने लिहिणाऱ्या (LEFT-HANDED) उमेदवारांना वारंवार पाने उलटून गणिती आकडेमोड करणे गैरसोयीचे ठरत होते. हा त्रास दूर करण्यासाठी एनटीएने आता २ रफ पाने प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीला (मुख्य सूचनांच्या पायानंतर लगेच) आणि उर्वरित २ पाने प्रश्नपत्रिकेच्या शेवटी देण्याचा निर्णय घेतला आहे.

हा बदल इंग्रजीसह सर्व प्रादेशिक भाषांमधील प्रश्नपत्रिकांसाठी लागू करण्यात आला आहे. एनटीएने स्पष्ट केले आहे की, अशा छोट्या सुधारणांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या अनुभवावर सकारात्मक परिणाम होतो. परीक्षेची निष्पक्षता, पारदर्शकता आणि सर्वोच्च सुरक्षा राखत संपूर्ण प्रक्रिया अधिक सुटसुटीत आणि विद्यार्थी-स्नेही बनवणे हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.

परीक्षेत कोणत्याही प्रकारचा गोंधळ उडू नये, यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशपत्रावरील आणि माहिती पुस्तिकेतील (INFORMATION BULLETIN) सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात आणि परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन 'एनटीए'च्या परीक्षा संचालकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळ HTTP://WWW.NTA.AC.IN किंवा HTTPS://NEET.NTA.NIC.IN ला भेट द्यावी. असे आवाहन आहे.

### विद्यार्थ्यांना वेळ अधिक

हजेरीपटावर स्वाक्षऱ्या करणे, ओळख पटवणे आणि इतर पर्यवेक्षकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मुख्य प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी पूर्ण वेळ मिळेल आणि प्रशासकीय कामांमुळे वेळ कमी पडल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होणार नाही.

# शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार?

**महाईन्यूज । मुंबई**

**राष्ट्रवादीचा (शरद पवार) २७ वा वर्धापनदिन साजरा होत असताना पक्षाच्या काँग्रेसबरोबर विलिनीकरणाच्या चर्चांना उधाण आले आहे. काँग्रेस मजबूत होण्याची गरज व्यक्त करताना यापूर्वी बाहेर पडलेल्यांनी एकत्र येण्याबाबत शरद पवारांनी पुढाकार घ्यावा अशी भूमिका शिवसेना (उबाठा) संजय राऊतांनी मांडली. तर, शरद पवारांनी विलिनीकरणाचा प्रस्ताव आधीच दिल्याचा खुलासा काँग्रेस नेते नाना पटोलेंनी केला आहे. यामुळे खरंच पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस एकत्र येणार का? याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या आहेत. यावर काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (उबाठा) आणि भाजपा नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.**



### प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदेंनी दिले स्पष्टीकरण

दरम्यान, नाना पटोलेंनी केलेला विलिनीकरणाचा दावा शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी फेटाळून लावला आहे. "काँग्रेसकडून कधीच विलिनीकरणाचा प्रस्ताव आला नाही, प्रस्ताव आला असता तर वरिष्ठांकडून माहिती देण्यात आली असती", असे शिंदेंनी स्पष्ट केले आहे. सिल्वर ओक निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीत देखील विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे शशिकांत शिंदेंनी स्पष्ट केले आहे.

"शरद पवारांकडून राष्ट्रवादी विलिनीकरणाचा प्रस्ताव आधीच देण्यात आला होता पण, काही कारणास्तव त्याला विलंब झाला", असा खुलासा काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी केला. "समविचारी पक्ष एकत्र देण्याची प्रक्रिया देश पातळीवर सुरु झाली असून, त्याचा भाग म्हणून तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) विलिनीकरणाचा विचार करत आहेत", असे पटोले म्हणाले. विलिनीकरणाची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली. दिल्लीत हायकमांडने बोलावलेल्या बैठकीला जात असताना पटोलेंनी विलिनीकरणावर भाष्य केले. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावर स्पष्ट प्रतिक्रिया देण्यास टाळले आहे.

"अखंड काँग्रेससाठी ज्येष्ठ नेते शरद पवारांनी पुढाकार घ्यावा", अशी भूमिका शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनी मांडली. "काँग्रेस अधिक मजबूत व्हायला पाहीजे. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या लहान पक्षांनी देशाची परिस्थिती समजून घ्यायला हवी. एक मजबूत काँग्रेस आणि प्रबळ काँग्रेस देशात पर्याय म्हणून उभी राहायला हवी. देशात ही भावना आणि विचार आकार घेतोय त्याचे शरद पवारांनी नेतृत्व केलं किंवा पुढाकार घेतला तर हा विचार पुढे जाईल", अशी भूमिक संजय राऊतांनी मांडली.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा यू-टर्न!

## इराणवरील हवाई हल्ले रद्द; शांतता कराराला मंजुरी मिळाल्याचा दावा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराणवर भीषण हल्ला करण्याची धमकी देणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी काही तासांतच यू-टर्न घेतला आहे. इराणबरोबर शांतता करारासंबधित सकारात्मक चर्चा झाल्याचा दावा करत, त्यांनी इराणवरील नियोजित हवाई हल्ले रद्द केल्याची घोषणा गुरुवारी रात्रीच्या सुमारास केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘ट्रुथ सोशल’ अकाउंटवरुन याविषयी माहिती दिलीय. “सर्वोच्च इराणी नेतृत्वाशी सकारात्मक चर्चा झाली असून, त्याला मंजुरीही मिळाली आहे”, असा दावा ट्रम्प यांनी या पोस्टमधून केला आहे.**



“इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाशी झालेली उच्च स्तरावरीय चर्चा सकारात्मक ठरली असून, त्याला मंजुरीही मिळाली आहे. म्हणूनच, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष या नात्याने मी आज रात्री इराणवर होणारे नियोजित हवाई हल्ले आणि बॉम्बवर्षाव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे,” असे डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या अधिकृत ‘ट्रुथ सोशल’ अकाउंटवरुन केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी इराणवर भीषण हल्ला करण्याचा इशारा देऊन खर्ग बेटावर ताबा मिळवण्याची शक्यताही त्यांनी बोलून दाखवली होती. पण, काही तासांतच त्यांनी चर्चेतून तोडगा निघाल्याचा दावा केला आहे.

शांतता कराराच्या चर्चेवर दोन्ही बाजूंच्या मध्यस्थांनी व्यापक चर्चा करुन मंजुरी मिळवली असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. “या कराराची मूळ संकल्पना आणि त्यातील तपशीलवार मुद्द्यांना संबंधित सर्वच देशांनी मंजुरी दिली आहे. यामध्ये अमेरिका, इस्त्रायल, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार, तुर्किये, पाकिस्तान, बहरीन, कुवैत, जॉर्डन आणि इजिप्तसह इतर महत्त्वाच्या देशांचा समावेश आहे,” असे ट्रम्प यांनी ‘ट्रुथ सोशल’वरील पोस्टमध्ये पुढे म्हटले आहे. पण, ट्रम्प यांनी या देशांच्या यादीत इराणचा उल्लेख कुठेही केला नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. करारावर स्वाक्षरी करण्याची वेळ आणि ठिकाण लवकरच जाहीर केले जाईल, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे.


### तोपर्यंत नाकेबंदी कायम

दरम्यान, करार पूर्ण होत नाही तोपर्यंत होर्मुझमधील नाकेबंदी कायम राहील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. “वरवर पाहता ही राजनैतिक प्रगती दिसत असली तरी, करार औपचारिकपणे पूर्ण होईपर्यंत अमेरिकी नौदलाची नाकेबंदी कायम राहील”, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या दाव्याप्रमाणे कराराला मंजुरी मिळाली असल्यास आणि इराण आणि अमेरिका यांच्यातील करार अंतिम झाल्यास जगासाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे.

## जजची परीक्षा देणाऱ्या महिलेला भर रस्त्यात सोडणे ‘ओला’ला पडले महाग

**महाईन्यूज । मुझफ्फराबाद**

**आंध्र प्रदेशमधील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जुनियर सिव्हिल जज या मुख्य परीक्षेला जाणाऱ्या एका महिला उमेदवाराला ‘ओला’ ऑटो चालकाने मध्यातच चुकीच्या ठिकाणी सोडून दिले. या बेजबाबदारपणामुळे महिला उमेदवाराला मानसिक मनस्ताप सहन करावा लागला. याप्रकरणी कुर्नूल येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने कठोर पाऊल उचलले असून, ‘ओला’ कंपनीला ५०,००० रुपये भरपाई आणि ५,००० रुपये खटल्याचा खर्च म्हणून एकूण ५५,००० रुपये पीडित महिलेला देण्याचे आदेश दिले आहेत.**




११ ऑक्टोबर २०२५ रोजी संबंधित महिला तिच्या आईसोबत गुंटूर येथून ‘आचार्य नागार्जुन युनिव्हर्सिटी’ येथील परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी निघाली होती. तिथे तिची न्यायाधीश पदाची मुख्य परीक्षा होती. तिने प्रवासासाठी ओला ॲपवरून एक ऑटो बुक केला.

महिलेने तक्रारीत नमूद केले की, ॲपवर दाखवलेल्या क्रमांकापेक्षा वेगळीच ऑटो रिक्षा आली. चालकाने प्रवास सुरू करण्यापूर्वीच ‘ओटीपी’ मागून घेतला. यानंतर चालकाने परीक्षा केंद्राकडे जाण्याऐवजी ऑटो भलतीकडेच वळवला आणि त्यांना नियोजित ठिकाणापासून तब्बल २५ किलोमीटर दूर घेऊन गेला. तिथे पोहोचल्यावर चालकाने परीक्षा केंद्रावर सोडण्यासाठी जादा पैशांची मागणी केली. महिलेने जादा पैसे देण्यास नकार दिला, तेव्हा चालकाने त्या दोघींना भर रस्त्यातच सोडून दिले आणि तो तिथून निघून गेला.

भर रस्त्यात अडकलेल्या या महिलेला अत्यंत मानसिक दडपणाखाली दुसऱ्या रिक्षाने स्वखर्चाने परीक्षा केंद्र गाठावे लागले. या गोंधळामुळे तिला प्रचंड मानसिक ताण आणि भीतीचा सामना करावा लागला, ज्याचा थेट परिणाम तिच्या परीक्षेतील परिणामांवर झाला. यानंतर तिने ओला कंपनीकडे तक्रार केली आणि कायदेशीर नोटीस बजावत ५ लाख रुपयांची नुकसानभरपाई मागितली.

### ग्राहक न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

ग्राहक मंचाचे अध्यक्ष करणम किशोर कुमार आणि सदस्य एन. नारायण रेड्डी व एस. नाझिमा कौसर यांच्या खंडपीठाने ओलाचा हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ ‘ऑनलाइन मध्यस्थ’ असल्याचे सांगून ओला कंपनी आपली जबाबदारी टाळू शकत नाही. ग्राहकाने ओलाच्या ब्रँडवर आणि विश्वासावर ही राइड बुक केली होती. ओटीपी पडताळणी आणि संपूर्ण यंत्रणा ओलाच्या प्लॅटफॉर्मवरून नियंत्रित केली जाते, त्यामुळे चालकाच्या सेवेतील त्रुटींना कंपनीच जबाबदार आहे. न्यायालयाने म्हटले की, महत्त्वाच्या परीक्षेच्या दिवशी एका महिला उमेदवाराला तिच्या आईसह रस्त्यावर सोडून देणे हा गंभीर निष्काळजीपणा आहे. यामुळे झालेल्या त्रासाची दखल घेत न्यायालयाने ओलाला ५०,००० रुपये भरपाई आणि ५,००० रुपये न्यायालयीन खर्च देण्याचे आदेश दिले. ग्राहक न्यायालयाच्या या निर्णयामुळे ऑनलाइन सेवा देणाऱ्या कंपन्यांना मोठा चपराक बसली आहे.

# सनी लियोनीला नोटीस?



राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने बेळगावच्या शिवम असोसिएट्सच्या कोट्यवधी रुपयांच्या महाघोटाळ्याप्रकरणी बॉलिवूडची सनी लियोनीला नोटीस बजावली आहे. या कंपनीने गुंतवणूकदारांना अव्वाच्या सव्वा व्याजदराचे आमिष दाखवून तब्बल २४०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून आता त्याचे धागेदोरे चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचल्याने खळबळ उडाली आहे. शिवम असोसिएट्सचा मालक मुख्य संशयित शिवानंद नीलण्णावर याने लोकांकडून बेकायदेशीरपणे जमा केलेल्या पैशांचा एक मोठा हिस्सा सनी लियोनीसह चित्रपटसृष्टीतील अनेक आघाडीच्या अभिनेते आणि अभिनेत्रींना हस्तांतरित केल्याचे सीआयडीच्या तपासात उघड झाले आहे. याच कारणास्तव सीआयडीने आता सनीला नोटीस पाठवून चौकशीसाठी पाचारण केले आहे. नीलण्णावरने या आर्थिक फसवणुकीसाठी नेटवर्क मार्केटिंगचा वापर केला होता. यामध्ये नवीन गुंतवणूकदारांकडून आलेला पैसा जुन्या गुंतवणूकदारांना मासिक व्याज किंवा लाभांशाच्या स्वरुपात वाटून विश्वास संपादन केला जात होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, पोलिसांनी मुख्य संशयित नीलण्णावरला अटक केल्यानंतरही लोकांचा त्याच्यावरील अंधविश्वास कमी झालेला नाही. त्याच्या अटकेच्या अवघ्या २० दिवसांत लोकांनी या फसवणूक करणाऱ्याच्या खात्यात ५ कोटींहून अधिक रुपये जमा केले आहेत. दरम्यान, सीआयडीने फसवणुकीच्या पैशातून खरेदी केलेली मालमत्ता जप्त करण्याची कारवाई वेगाने सुरु केली आहे. नीलण्णावरने कंपनीचे पैसे स्वतःच्या खात्यात हस्तांतरित करुन, सुमारे ५५ कोटी रुपये खर्च करत एक आलिशान वेलफायर, दोन मर्सिडीज बेंझ, डिफेंडर, वेर्ना आणि व्होल्वो एक्ससी ९० यांसारख्या अत्यंत महागड्या गाड्या खरेदी केल्या होत्या, ज्या जप्त केल्या जात आहेत. या प्रकरणातील आदित्यराज कंपनीचा सीईओ बलराज माने अद्याप पोलिसांसमोर हजर झालेला नसल्याने तपासावर काही मर्यादा आल्या आहेत.



## कंगनाचा रॉयल अंदाज!

बॉलिवूड अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौत सध्या तिच्या 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. 12 जूनला हा चित्रपट देशभरातील चित्रपटगृहांमध्ये रिलीज करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाची उत्सुकता चाहत्यांना लागली होती. अखेर हा चित्रपट चाहत्यांच्या भेटीला आला आहे. कंगनाने या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये कोणतीही कसर सोडलेली नाही. रिलीजच्या दिवशीच कंगनाच्या 'भारत भाग्य विधाता' चित्रपटाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांकडून मिळताना दिसत आहे. या चित्रपटातील तिच्या दमदार अभिनयामुळे कंगनाचे कौतुक केले जात आहे. अशातच या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी कंगनाच्या नव्या फोटोशूटचीही जोरदार चर्चा आहे. चित्रपटाच्या ग्रँड प्रीमियरला हजेरी लावण्यासाठी कंगना जोधपूरमध्ये दाखल झाली होती. तिने उम्मेद भवन पॅलेसला भेट दिली आणि मेहरानगड किल्ल्यातील माँ चामुंडा मंदिरात जाऊन आशीर्वाद घेतले. तसेच तिने रतनदा येथील गणेश मंदिरात देशाच्या समृद्धीसाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थनाही केली. या सगळ्यात कंगनाने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर नव्या लूकचे फोटो शेअर केले आहेत.

## प्राजक्ता माळीची साऊथमध्ये एन्ट्री!



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी आता आपल्या कारकिर्दीतील नव्या पर्वाला सुरुवात करत आहे. अभिनय, सूत्रसंचालन, नृत्य, चित्रपट निर्मिती आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी प्राजक्ता आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे. मराठी मालिकांपासून ते चित्रपटांपर्यंत विविध भूमिका साकारत प्राजक्ताने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिच्या सहजसुंदर अभिनयामुळे आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे ती महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचली. आता ती तेलुगू चित्रपटसृष्टीत झळकणार असल्याने चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्राजक्ताच्या आगामी तेलुगू चित्रपटाचे चित्रीकरण सध्या सुरू असून हा चित्रपट याच वर्षी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. मात्र चित्रपटाची कथा, कलाकारांची फळी आणि प्राजक्ताची भूमिका याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. यासंदर्भातील तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. प्राजक्ता या चित्रपटात कोणत्या भूमिकेत दिसणार, तिचा लूक कसा असेल आणि ती कोणत्या दाक्षिणात्य कलाकारांसोबत स्क्रीन शेअर करणार, याबाबत चाहत्यांमध्ये विविध चर्चा रंगल्या आहेत. मराठी मनोरंजन विश्वात यशस्वी कारकीर्द घडवल्यानंतर आता तिच्या साऊथ इंडस्ट्रीतील नव्या प्रवासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, प्राजक्ताच्या करिअरची सुरुवात वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी 'क्या मस्ती क्या धूम' या रिॲलिटी शोमधून झाली होती. मात्र तिला खरी लोकप्रियता मिळाली ती छोट्या पडद्यावरील मालिकांमुळे. २०११ मध्ये 'सुवासिनी' मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर २०१३ मध्ये 'जुळून येती रेशीमगाठी' मालिकेतील 'मेघना देसाई' या भूमिकेने तिला घराघरांत पोहोचवले. अभिनेत्री म्हणून यश मिळवल्यानंतर प्राजक्ताने निर्मिती क्षेत्रातही पाऊल ठेवले. तिची निर्मिती आणि प्रमुख भूमिका असलेला 'फुलवंती' हा चित्रपट विशेष चर्चेत राहिला. या चित्रपटातील नर्तकीची भूमिका साकारताना तिने आपल्या भरतनाट्यम कौशल्याचाही प्रभावीपणे वापर केला. आता मराठीनंतर तेलुगू चित्रपटसृष्टीतही ती आपल्या अभिनयाची छाप उमटवण्यासाठी सज्ज झाली आहे.

# भारताच्या पोरी यंदा इतिहास घडवणार?

## टी-२० विश्वचषकाचे स्वप्न पूर्ण करणार? जाणून घ्या सर्वात मोठी ताकद अन् कमजोरी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**महिला टी २० विश्वचषक स्पर्धा आजपासून सुरू होत असून यात एकूण १२ संघ सहभागी होणार आहेत. एकदिवसीय विश्वचषकातील विजेतेपदाचा दुष्काळ संपवल्यानंतर, आता भारतीय संघाचे लक्ष पहिल्या टी २० विजेतेपदावर आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर महिला टी २० विश्वचषकात विक्रमी १० व्यांदा सहभागी होत आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाला ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यासोबत 'गट अ' मध्ये स्थान देण्यात आले आहे.**



### मजबूत फिरकी गोलंदाजी आणि उत्कृष्ट वेगवान गोलंदाज

फलंदाजीनंतर, भारतीय संघाची सर्वात मोठी ताकद त्यांची फिरकी गोलंदाजी आहे. संघात अनुभवी दीप्ती शर्मा आहे, जी फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळेल. तिच्यासोबत संघात विश्वविजेती राधा यादव आणि श्री चरणी यांचाही समावेश आहे. श्रेयंका पाटीलही संघाचा भाग आहे; हा गट प्रतिस्पर्धी संघांना कोलमडून टाकण्यास सक्षम आहे. वेगवान गोलंदाजीच्या आघाडीवर भारताकडे विश्वविजेती रेणुका ठाकूर आणि क्रांती गौड ही जोडी आहे. यात नंदिनी शर्माच्या समावेशामुळे अधिक ताकद मिळाली आहे; नंदिनी ही एक उत्कृष्ट वेगवान गोलंदाज आहे.

भारतीय संघ १४ जून रोजी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. स्पर्धेपूर्वी, यजमान इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता. तसेच, विश्वचषकापूर्वी इंग्लंडविरुद्धची टी २० मालिकाही संघाने १-२ अशा फरकाने गमावली होती. संघासमोर काही आव्हाने आणि काही जमेच्या बाजू आहेत.

भारताचे यश बऱ्याच अंशी स्मृती मानधना आणि शफाली वर्मा या सलामीच्या जोडीवर अवलंबून असेल. सध्या ही जोडी खराब फॉर्ममध्ये असल्याचे दिसून येत आहे. स्मृतीने तिच्या गेल्या सहा टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकही अर्धशतक झळकावलेले नाही, तर शफालीचा अलीकडील फॉर्मही चिंतेची बाब आहे. जर ही जोडी चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरली, तर भारतीय संघाच्या अडचणी वाढू शकतात.

भारतीय महिला संघाने जरी एकदिवसीय विश्वचषक जिंकला असला, तरी टी २० मध्ये दडपणाचा सामना करणे हे एक मोठे आव्हान राहिले आहे. विशेषतः 'डेथ ओव्हर्स'मध्ये गोलंदाजी करताना किंवा डाव आणि सामना फिनिश करताना. फलंदाजीच्या बाबतीत, संघ मोठ्या प्रमाणावर रिचा घोषवर अवलंबून आहे; इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात हे स्पष्ट झाले होते. गोलंदाजी आघाडीवर, रेणुका ठाकूर, राधा यादव आणि दीप्ती शर्मा यांसारख्या अनुभवी खेळाडूंना जबाबदारी पेलावी लागेल. याव्यतिरिक्त, फलंदाजीत राधा, दीप्ती आणि भारती फुलमाळी यांना रिचाला साथ द्यावी लागेल.

याला भारतीय महिला संघाची कमजोरी म्हणता येणार नाही, परंतु आव्हानांचा विचार करता, सर्वात मोठे अडथळे म्हणजे त्यांचा गट अजिबात सोपा नाही. या गटात भारतासोबत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारखे बलाढ्य संघ आहेत. चिंतेची बाब म्हणजे भारतीय संघाला या दोन्ही संघांविरुद्ध खेळताना सातत्याने संघर्ष करावा लागला आहे. शिवाय, याच गटात बांगलादेश आणि पाकिस्तानचाही समावेश आहे आणि त्यांनाही कमी लेखून चालणार नाही. परिणामी, या स्पर्धेत 'गट अ' हा अत्यंत कठीण गट ठरू शकतो. या टी-२० विश्वचषकात अनुभव ही भारतीय महिला संघाची सर्वात मोठी ताकद आहे; संघात अनुभवी खेळाडू आहेत. अगदी युवा शेफाली वर्माकडेही अनेक वर्षांचा अनुभव आहे. त्याचबरोबर, उपकर्णधार स्मृती मानधना आणि मधल्या फळीतील फलंदाज व कर्णधार हरमनप्रीत कौर या आपल्या कारकिर्दीतील १० वा विश्वचषक खेळणार आहेत. याव्यतिरिक्त, अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा, मधल्या फळीतील मुख्य आधारस्तंभ जेमिमाह रॉड्रिग्ज आणि सर्वात अनुभवी गोलंदाज रेणुका ठाकूर संघाचा भक्कम आधार आहेत.

# न्यूझीलंड क्रिकेटमधील एका युगाचा अंत; केन विलियमसनची निवृत्ती

**महाईन्यूज । न्यूझीलंड**

**न्यूझीलंडचा दिग्गज फलंदाज आणि माजी कर्णधार केन विलियमसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. 35 वर्षीय विलियमसनने सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा म्हटले असून, त्याच्या तब्बल 16 वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीचा आता शेवट झाला आहे.**



### शांत स्वभाव, संयमी नेतृत्व आणि उत्कृष्ट फलंदाजी

क्रिकेटच्या मैदानावर शांत स्वभाव, संयमी नेतृत्व आणि उत्कृष्ट फलंदाजी यामुळे केन विलियमसनची ओळख निर्माण झाली. त्याच्या निवृत्तीमुळे केवळ न्यूझीलंडच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्व एका महान खेळाडूला मुकणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याची बॅट पुन्हा दिसणार नसली, तरी त्याची कामगिरी आणि वारसा भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या खेळातील सातत्य, नम्रता आणि क्रीडाभावामुळे तो जगभरातील क्रिकेटप्रेमींच्या मनात कायम विशेष स्थान राखून राहील. क्रिकेटच्या इतिहासात त्याचे नाव एक आदर्श कर्णधार आणि महान फलंदाज म्हणून कायम सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल.

विलियमसनच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंड संघाने अनेक आयसीसी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. त्याच्या कर्णधारपदात न्यूझीलंडने भारताचा पराभव करत ICC World Test Championship Final 2021 जिंकली होती.

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेदरम्यान विलियमसनने निवृत्तीची घोषणा केली. लॉर्ड्स कसोटीत पराभवानंतर न्यूझीलंड संघ मालिकेत 0-1 ने पिछाडीवर असतानाच हा निर्णय समोर आला.

न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "विलियमसनच्या निवृत्तीमुळे 16 वर्षांच्या शानदार आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा अंत झाला आहे. या काळात त्याने 378 सामने खेळले, असंख्य विक्रम आपल्या नावावर केले आणि जगभरातील क्रिकेटप्रेमींचा आदर मिळवला."

निवृत्तीनंतर भावना व्यक्त करताना विलियमसन म्हणाला, "या निर्णयाबद्दल मी बराच काळ विचार करत होतो. गेल्या काही दिवसांत मला जाणवले की आता योग्य वेळ आली आहे. न्यूझीलंडसाठी खेळताना मी प्रत्येक सामन्यात माझे सर्वस्व दिले. त्यापेक्षा कमी समर्पणाने पुढे खेळणे योग्य ठरले नसते. त्यामुळे स्वतःच्या अटींवर निरोप घेता येत असल्याचा मला आनंद आहे."

विलियमसनची कारकीर्द आकडेवारीच्या दृष्टीनेही अत्यंत प्रभावी राहिली. त्याने 378 आंतरराष्ट्रीय सामने खेळत 19,346 धावा केल्या. त्याच्या नावावर 48 आंतरराष्ट्रीय शतके आणि 6 द्विशतके आहेत. 2015 मध्ये त्याला ICC Cricketer of the Year पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच 2019 मध्ये तो ICC Test Cricketer of the Year ठरला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।
दि. 13 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# धूळ खात पडल्या टपालपेट्या; पत्रव्यवहार झाला इतिहासजमा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

एकेकाळी सुख-दुःखाचे संदेश, नोकरीच्या संधी, लग्नपत्रिका आणि महत्त्वाच्या कागदपत्रांचे मुख्य माध्यम असलेल्या टपालपेट्या आज धूळ खात पडल्या आहेत. मोबाईल, ई-मेल, व्हॉट्सअॅप आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे पत्रव्यवहाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले असून शहरातील अनेक लाल रंगाच्या टपालपेट्यांवर गंज चढल्याचे चित्र दिसत आहे.

पूर्वी गावोगावी पत्रपेट्या हे संवादाचे महत्त्वाचे साधन होते. नागरिक आपली खुशाली, निरोप किंवा इतर माहिती पत्राद्वारे पाठवत असत. पोस्टमन दररोज पत्रे गोळा करून ती संबंधित ठिकाणी पोहोचवत असे. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात संवादाची साधने बदलल्याने पत्रांचे महत्त्व कमी झाले आहे.

काही वर्षांपूर्वी पोस्टमनकडे "पत्र आले का?" अशी विचारणा केली जात होती. नोकरीची ऑर्डर, न्यायालयीन नोटिसा, मनिऑर्डर, लग्नपत्रिका आणि विविध प्रकारचे संदेश टपालाद्वारेच पोहोचत असत. आता मात्र काही क्षणांत व्हॉट्सअॅप, ई-मेल किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून संदेश संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचत असल्याने पत्रव्यवहार लक्षणीयरीत्या घटला आहे. नागरिक आता पत्रांपेक्षा भ्रमणध्वनीवर संवाद साधणे किंवा डिजिटल माध्यमांचा वापर करणे पसंत करीत असल्याने अनेक टपालपेट्या वापराअभावी दुर्लक्षित झाल्या आहेत.

> “ पत्रपेटी दररोज उघडली जाते. मात्र, पोस्टाच्या बाहेरील पत्रपेटीत कमी पत्र असतात. पोस्टाच्या आवारातील पत्रपेटीत पत्राचे प्रमाण जास्त आहे.
>
> **- के. एस. पारखी, जनसंपर्क अधिकारी, डाक विभाग**

के. एस. पारखी, जनसंपर्क अधिकारी, डाक विभाग यांनी सांगितले की, टपालपेट्या दररोज उघडल्या जातात. मात्र, पोस्ट कार्यालयाबाहेरील टपालपेट्यांमध्ये पत्रांचे प्रमाण अत्यल्प असून पोस्ट कार्यालयाच्या आवारातील टपालपेट्यांमध्ये तुलनेने अधिक पत्रे आढळतात.

## तंत्रज्ञानाने बदलली संवादाची पद्धत

मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे पत्रलेखनाची परंपरा मागे पडत आहे. काही क्षणांत संदेश पोहोचविणाऱ्या डिजिटल माध्यमांमुळे टपालपेट्यांचे महत्त्व कमी झाले असून एकेकाळी गजबजलेल्या लाल पत्रपेट्या आता अस्तित्व टिकवण्यासाठी झुंज देताना दिसत आहेत.





# महाराष्ट्रातील भव्य लक्ष्मी-नारायण पूजन सोहळा!

## पिंपरी-चिंचवडमध्ये तब्बल 330 अधिक ब्राह्मण दांपत्यांचे पाद्यपूजन, सन्मान व स्नेहभोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**हिंदू धर्मातील पवित्र अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त धर्मसंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि सनातन परंपरांचा गौरव करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे महाराष्ट्रातील सर्वात मोठा लक्ष्मी-नारायण पूजन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार व भाजपाचे नेते महेश लांडगे आणि शिवांजली सखी मंचच्या प्रमुख पूजा महेश लांडगे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.**





> “अधिक मास हा केवळ धार्मिक विधींचा कालखंड नसून, आत्मशुद्धी, संस्कार संवर्धन आणि समाजप्रबोधनाची एक पवित्र संधी आहे. ब्राह्मण दांपत्यांचा सन्मान, धर्मपरंपरांचे जतन आणि समाजात अध्यात्मिक मूल्यांची रुजवणूक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित केला. सनातन हिंदू संस्कृतीची ही अमूल्य परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. धर्म, संस्कृती आणि समाजसेवा यांचा संगम घडविणारे असे उपक्रम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. प्रत्येकाच्या जीवनात श्रद्धा, सदाचार आणि सेवाभाव वृद्धिंगत होवो, हीच प्रभू श्री लक्ष्मी-नारायण चरणी प्रार्थना आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

जय गणेश लॉन, मोशी येथे आयोजित या आध्यात्मिक सोहळ्यात राज्यभरातून आलेल्या तब्बल 330 अधिक ब्राह्मण दांपत्यांचे विधिवत पाद्यपूजन, लक्ष्मी-नारायण पूजन, सन्मान व स्नेहभोजन आयोजित करण्यात आले. वेदमंत्रांच्या मंगलमय घोषात आणि धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांना अध्यात्मिक ऊर्जा व सनातन संस्कृतीचे दर्शन घडविले. मंचावरील श्री. विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

अधिक मास हा हिंदू धर्मशास्त्रानुसार अत्यंत पुण्यदायी मानला जातो. या काळात दान, धर्म, जप, तप आणि पूजनाला विशेष महत्त्व असल्याने ब्राह्मण दांपत्यांचा सन्मान करून धर्मसेवेची परंपरा जोपासण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या ब्राह्मण दांपत्यांना सन्मानपूर्वक आहेर प्रदान करण्यात आले.

या भव्य सोहळ्यास कला, शिक्षण, आरोग्य, प्रशासकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, महिला प्रतिनिधी तसेच हजारो नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून धर्मसंस्कृतीप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजात धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

यावेळी आमदार महेश लांडगे म्हणाले, “अधिक मासाच्या निमित्ताने समाजात धार्मिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन व्हावे, तसेच सनातन परंपरांचा गौरव पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.” तसेच, शिवांजली सखी मंचच्या प्रमुख पूजा लांडगे यांनीही धर्मकार्य, संस्कार संवर्धन आणि समाजप्रबोधनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. धर्म, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा संगम ठरलेल्या या भव्य सोहळ्याने अधिक मासातील पुण्यपर्वाला एक विशेष अध्यात्मिक उंची प्राप्त करून दिली. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या लक्ष्मी-नारायण पूजन सोहळ्याच्या माध्यमातून सनातन संस्कृतीच्या जतनाचा आणि समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाला ‘प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस पार्टनर’ सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी यांना पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘प्लॅटिनम सस्टेनेबल कॅम्पस पार्टनर’ हा मानाचा बहुमान प्रदान करण्यात आला आहे.**



हा सन्मान रिसर्च हाइट्स फाउंडेशन व एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (EPTRI) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘भारत एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम – भारत सस्टेनेबिलिटी कॅम्पस मिशन २०२६’ अंतर्गत प्रदान करण्यात आला.

जागतिक पृथ्वी सप्ताह (२२ ते २९ एप्रिल २०२६) निमित्त हैदराबाद येथील ग्लोबल पीस ऑडिटोरियम येथे आयोजित विशेष कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने डॉ. अशोक मोरे, डॉ. स्वाती जाधव आणि डॉ. सुहास पाटील यांनी सहभाग नोंदवून संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र स्वीकारले. महाविद्यालयाने कॅम्पस परिसरात राबविलेल्या हरित उपक्रम, पर्यावरण जनजागृती, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत, जलसंधारण, प्लास्टिकमुक्त परिसर, विद्यार्थी सहभाग आणि शाश्वत विकासासाठी केलेल्या विविध प्रयत्नांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

या यशाबद्दल डॉ डी वाय पाटिल शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष श्री. सतेज पाटील, डी वाय पाटिल प्रतिष्ठान चे विश्वस्त श्री. तेजस पाटील, संकुलाचे संचालक रीअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी मालती, यांनी सर्व सहभागींचे अभिनंदन केले. हा सन्मान संस्थेच्या शाश्वत भारत घडविण्याच्या बांधिलकीची पावती असून भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सत्तर हजारांची लाच घेताना बीट निरीक्षकाला अटक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपळे गुरव येथील एका गुंठ्यातील तीन मजली अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येणार नाही, असे सांगून 70 हजारांची लाच स्वीकारणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बीट निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने गुरुवारी (दि 11) रंगेहाथ पकडले आहे.

उमेश अरुण लोंढे (वय 28, रा. शिवराजनगर, रहाटणी) याला लाचेची रक्कम घेताना रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाच्या पार्किंगमध्ये अटक करण्यात आली. याप्रकरणी एका 58 वर्षीय तक्रारदाराने फिर्याद दिली आहे.

तक्रारदार यांची पिंपळे गुरव येथे एक गुंठा जागा असून, त्यांनी तीन मजली बांधकाम केले आहे. मात्र, महापालिकेची परवानगी घेतलेली नव्हती. त्यामुळे हे बांधकाम अनधिकृत असल्याचे दर्शवून महापालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडून 25 फेब्रुवारीला तक्रारदारांना नोटीस बजावण्यात आली होती.

त्या नोटिसीविरोधात तक्रारदाराने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी होऊन तक्रारदार यांना महापालिकेत जाऊन नियमानुसार दंड भरून त्यांनी केलेले बांधकाम नियमित करून घेण्याबाबचे आदेश देण्यात आले होते.

त्यानंतर बांधकाम नियमित करण्यासाठी त्यांनी अर्ज दाखल केला होता. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक उमेश लोंढे हा ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या पिंपळे गुरव वॉर्ड अतिक्रमण विरोधी विभागाचा बीट निरीक्षक म्हणून काम पाहत होता. त्या वेळी लोंढे याने तक्रारदार यांना भेटण्यास बोलवून अनधिकृत बांधकाम पाडावे लागेल, असे सांगितले. त्यावर तक्रारदाराने निकालाची प्रत दाखवली.

# शहरात विकासकामांचा आढावा, जनसंपर्क अभियान

## मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्याचा गौरव; भाजपा आमदार महेश लांडगे यांचे नेतृत्व

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यपूर्ती निमित्त भारतीय जनता पक्षातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. "१२ वर्षे सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाची" या संकल्पनेला जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत निगडी**



"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत देशाने विकास, सुशासन आणि गरीब कल्याणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. केंद्र सरकारच्या जनहिताच्या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सातत्याने सुरू आहे. पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठीही आपण कटिबद्ध असून नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरत विकासकामांची गती अधिक वाढविणार आहोत. देव-देश- धर्म अभिमान, सेवा, सुशासन आणि जनकल्याण हीच आमची कार्यसंस्कृती असून विकसित भारताच्या निर्मितीत प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे."

– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

गुरूवारी, दि.११ जून रोजी सकाळी ९.३० वाजता निगडी बस स्टॉप आणि भक्ती शक्ती मेट्रो स्टेशन येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांना आमदार महेशदादा लांडगे यांनी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नागरिकांना उपलब्ध होत असलेल्या आधुनिक सुविधांचा आढावा घेण्यात आला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

त्यानंतर सकाळी १० वाजता अमृता विद्यालय ते साईनाथ नगर या परिसरात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानात भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर स्वच्छतेचा संदेश दिला. स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून देशभरात झालेल्या परिवर्तनाचा उल्लेख करत नागरिकांनी स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले.

यानंतर सकाळी १०.३० वाजता सनराईज टॉवर्स कम्युनिटी हॉल येथे विशेष जनसंपर्क अभियान पार पडले. माता अमृतानंदमयी शाळेसमोरील या कार्यक्रमात नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, गरीब आणि वंचित घटकांसाठी राबविण्यात आलेले उपक्रम तसेच देशाच्या विकासासाठी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय यांची माहिती देण्यात आली. यावेळी नागरिकांच्या समस्या व सूचनाही जाणून घेण्यात आल्या.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षात देशाने विकास, सुशासन आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली आहे. गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे. विकसित भारताच्या दिशेने देशाची वाटचाल अधिक वेगाने सुरू असून जनतेचा विश्वास आणि सहभाग हेच या यशामागील प्रमुख बळ असल्याचे त्यांनी नमूद केले. या सर्व कार्यक्रमांना भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमामुळे मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्याचा आढावा जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचला असून विकास आणि जनसेवेचा संदेश अधिक बळकट झाला.

### विकासकामांच्या नियोजना बाबत अधिकाऱ्यांना सूचना

या पाहणीदरम्यान सुरू असलेल्या विकासकामांचा दर्जा, गती आणि नियोजन याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. नागरिकांना अधिक सुरक्षित, आधुनिक आणि सुविधायुक्त पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आमदार महेशदादा लांडगे यांनी स्पष्ट केले. निगडी आणि परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांना वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या नागरिकांनी परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची सामूहिक शपथ घेतली. स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# पिंपरी-चिंचवड मनपा रुग्णालयात कॅशलेस सुविधेचा अभाव; रोकड भरण्यासाठी धावपळ

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची सर्वच रुग्णालये कॅशलेस सुविधेअभावी मागे पडली आहेत. रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात रोख पैसे भरुनच केसपेपर, बिलाची रक्कम जमा करावी लागते. कॅशलेस सुविधा नसल्याने रुग्ण नातेवाईकांची धावपळ होत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत 1 एप्रिल 2025 पासून पेपरलेस कामकाज सुरू झाले आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेत 1 एप्रिल 2025 पासून पेपरलेस कामकाज सुरू झाले आहे.

मात्र, महापालिकेची रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार सुरू करणे प्रशासनाला शक्य झालेले नाही, वर्षभरात फक्त वायसीएम आणि थेरगाव रुग्णालयातच कॅशलेस सुविधा उपलब्ध झाली आहे. इतर ठिकाणी रुग्ण व त्याच्यासोबत आलेल्या नातेवाईकांची गैरसोय होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांत येणाऱ्या रुग्णांना केसपेपर काढण्यासाठी तसेच बिलिंग काउंटरवर कॅशलेस सुविधा नसल्यामुळे रोख स्वरुपात शुल्क भरावे लागते. अनेकदा नागरिकांकडे सुटे पैसे नसल्यास कर्मचारी त्यांच्या सोयीसाठी पेपर देतात.

मात्र, उरलेले पैसे देण्यासाठी काउंटरवर सुटे पैसे उपलब्ध होईपर्यंत वाट पाहावी लागते. काही वेळा औषधे घेण्यासाठी पुन्हा सुट्या पैशांची आवश्यकता भासते. परिणामी नागरिक काउंटरवरच थांबतात किंवा जवळच्या दुकानातून पाण्याची बाटली, बिस्किटे घेऊन सुटे पैसे मिळवतात. यामुळे अनावश्यक खर्च वाढतो.

जवळचे उपाहारगृहचालक ऑनलाइन पेमेंट केल्यावर आपल्याला रोख पैसे देईलच याची खात्री नसते. त्यामुळे ऑनलाइन पेमेंटचा निर्णय महापालिकेने लवकर घ्यावा, अशी मागणी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून जोर धरू लागली आहे. महापालिका क्षेत्रातील रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार प्रणाली सुरू झाल्यास नागरिकांना सुलभ सेवा मिळू शकतील, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. शासकीय, निमशासकीय सर्वच क्षेत्रात रोखीच्या व्यवहाराऐवजी कॅशलेस व्यवहार करण्यास आता प्राधान्य देण्यात येत आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेची रुग्णालय, दवाखान्यांमध्ये कॅशलेस व्यवहाराचा पर्याय प्रशासनाकडून दिलेला नाही. केसपेपर, उपचार बिलाची रक्कम जमा करताना रोख पैसे नसल्यास रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना धावपळ करावी लागते. पेपरलेस आणि स्मार्ट कारभाराचा दावा करणारे महापालिका प्रशासन रुग्णालयांमध्ये कॅशलेस बिलिंग अद्याप मागे असल्याचे दिसून येत आहे.

### कॅश काउंटरवर वादाचे प्रसंग

महापालिकेच्या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये दररोज हजारो रुग्णांवर उपचार होतात. मात्र, सर्व रुग्णालयात रुग्णांच्या उपचारांचे पैसे ऑनलाइन स्वीकारण्याची व कॅशलेस व्यवहाराची सुविधा नाही. त्यामुळे अनेकवेळा रुग्णांकडे रोख पैसे नसल्याने वादा-वादीचे प्रसंग घडता. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून कॅशलेस आणि डिजिटल व्यवहार सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रुग्णाला डिस्चार्ज देताना त्याची कागदपत्रे आणि त्याचे बिलिंग करण्यासाठी कोणतीही ऑनलाईन सुविधा नसल्याने याठिकाणी बिल करताना मोठी अडचण येते.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
BLOOD
DONATION
DRIVE
Saturday, 13 June 2026
TIME: 09:30 AM - 12:30 PM
LOCATION: SCHOOL CAMPUS